म. ग्र. स. ठाणे
विषय काव्य
सं नं. ६४०

# सुप्रसिद्ध दोन ऐतिहासिक पोंवाडे.

## (श्रीमंत नारायणराव पेशवे व खर्ड्याची लढाई)

REFBK-0002857
REFBK-0002857
वा. क्र. २८५१०

प्रकाशकः— गो. स. पळसुले.
चिटणीस, भारत स्व. से. मं. पुणें.

मुद्रक—शंकर नरहर जोशी, चित्रशाळा प्रेस १०२३ सदाशिव पेठ, पुणें.

# प्रकाशकाचे दोन शब्द.

श्रीमंत नारायणराव पेशवे यांचा पोंवाडा शके १८४५ सालच्या पुण्याच्या श्रीशिवजयंत्युत्सवांत म्हटला गेला होता. हा जुना पोंवाडा चाल व काव्य या दृष्टीनें बऱ्यापैकीं असल्यामुळें व ऐकणारांसहि तो अवडला असल्यामुळें तो स्वतंत्र रीतिनें छापून काढण्याची अवश्यकता भासली. यांत छापलेले दोनहि पोंवाडे आक्वर्थ आणि शाळिग्रामकृत छापलेल्या ऐतिहासिक पोंवाड्यांत आहेत. परंतु तें मोठें पुस्तक सर्वच घेऊं शकत नाहींत व या दोनहि पोवाड्यामध्यें थोडें पाठांतरहि आहे.

जुन्या पोंवाड्यास उत्तेजन देण्यासाठीं भारत स्वयंसेवक मंडळ गेलीं चार पांच वर्षें खटपट करीत आहे. हें सर्वश्रुतच आहे. सदर पोंवाड्यांचा प्रसार सर्वत्र होण्यासाठीं व तज्ञ माणसांस तरी, पोंवाड्याची चाल वगैरे कळून म्हणण्यास अडचण पडूं नये म्हणून सदर दोनहि पोंवाड्यांचें नोटेशन ( स्वरज्ञान चिन्ह पद्धति ) सोबत जोडलें आहे.

जुने अगर नवीन ऐतिहासिक चांगले पोंवाडे जसजसे मिळत जातील तसतसें मंडळाच्या सांपत्तिक परिस्थितीस अनुसरून छापण्याचा विचार आहे.

भा. स्व. से. मंडळ, पुणें }
२२ बुधवार.

गो. स. पळसुले
चिटणीस.

REFBK-0002857
REFBK-0002857
२८५७

# श्रीमंत नारायणराव पेशवे यांचा पोंवाडा

दक्खनचा दिवा मालवला हिरा हरपला । काय गुपीत घाला केला नारायणरावाला ॥ ( कशी करुणा नव्हती आली राघोबाला । अपघात करुन मारिलें नारायणरावाला ॥ ध्रुवपद ) ॥

एकछत्र करुनि गेले राव माधवराव । थरथरां कांपत होते अष्ट उमराव ॥ वसविलें हस्तनापुर राज्य पाऱ्छाव । दादासि मोकळे केलें राज्यकरावें ॥ तुटली आयुष्याची दोरी नाहीं उपाव । त्यांनीं मरते समयीं बोलाविले नारायणराव ॥ उपदेश केला भरली नेत्रीं आसव ॥ दादांसि मिळोन असावें॥ रयतेला दुःख न द्यावें । द्वैत केवळ न करावें । प्रीतीनें राज्य करावें ॥ ...गें गादी सांभाळुनि रहावें । माझ्या मोक्षपदचें वचन संभाळावें ॥ (चाल) आनंदीबाईला जवळ बोलाविलें । बया आम्ही जातों मोक्षपदाला तुम्हा कळविलें ॥ ओट्यांत नारायणराव तुमच्या घातला । बहु प्रकारें विनविले आनंदबाईला । मग माधवरायानें प्राण सोडिला । कशी करुणा नव्हती भगवाना तुला ॥ अपघात करुनि मारिला सख्या पुतण्याला ॥दक्खनचा १॥

श्रीमंती राज्यामधिं पुण्याची महिमा कशी होती । जागजागीं अनुष्ठानें ब्राह्मणभोजनें होती ॥ चोहोकडे राज्यामध्यें वेदघोष चालती ॥ तुपपोळी खायाला नव्हती ब्राह्मणांस निवंती । कशा नालख्या पालख्या घरोघर फिरती ॥ स्वारी श्रीमंतांची निन्य पर्वतीला जाती । काय आरसेमहाल मजा दिसे वाड्याची ॥ सोन्याचा गणपती पूजा श्रीमंतांची ॥ बुधवारचा वाडा मसलत पंचाइतीची ॥ कारंजेवाडा सदर नाना भाऊची ॥ (चाल) ॥ काय बैठक रावसाहेबाची । पानविडे मजा खायाची ॥ लोक येतात मुजऱ्याशी । गुणी चतुरजन दाविती चातुर्याशी । गुण पाहुन देती तनख्याशी । कारंजे लाविली वाड्यांत पाण्याची ॥ जुना वाडा बांधला बुरुज लढायाशी॥(चाल)॥ नळाला काम लाविलें, हुकूम झाला । पुढें कोट बांधणार होते शहर पुण्याला ॥ पण करुणा नाहीं आली भगवाना तुला । अपघात करुनि सख्या ...ाला ॥ दक्खनचा० ॥ २ ॥

माधवराव मोक्षपदाशीं गेला । चिंता पडली नानाफडनविसाला ॥ नारा

यण महाराज नेले साताऱ्याशी ॥ शाहूरायाच्या तक्तापाशीं ॥ शिक्के कट्यार वस्त्रें दिलीं नारायणाशी । पुण्याची गादी मिळाली नारायणाशी ॥ जणु सूर्यनारायण उगवले आकाशीं । आला वाजवीत चौघडा शहर पुण्याशी । कूच करुनि लौकर नेले नाशकाशी ॥ दुसऱ्याची बुद्ध ऐकत निमित्याशी ॥ मग येउनि जती केली नारायणाशी ॥ ( चाल ) ॥ फार झाले बंदोबस्ती ॥ घोड्याची गस्त हिंडती । चौक्याची बंदोबस्ती । नारायण धरायासाठीं ॥ आनंदीबाईनें मांडिली हिकमती ॥ माझ्या राज्यपदाची माळ गंगाबाईला दिली कशी ॥ ( चाल ) ॥ पुढलें होणार जाणार ठाऊक कोणाला ॥ होयाचें होऊन जाईल शब्द देवाला ॥ नारायणराव मुकले बाई प्राणाला ॥ दक्खनचा० ॥ ३ ॥

भाद्रपद तेरशी दिवस सोमवार त्या दिवशीं, दिवस चढला दोन प्रहर ॥ सुमेरशिंग गारदी होऊन तयार ॥ त्या आनंदीबाईनें बोलाविला कचेरीवर ॥ आनंदीबाई बोल सुमेरसिंगाला ; तुला भाऊ म्हणोन माझा मी मानिला ॥ जर खरें सांगशील मला आनंदीबाईला ॥ हें पुणें शहर अर्धे देईन तुला । बेल भंडार तुळशीपत्र इमान तुला न मला। दोघांची क्रिया झाली बेलबागाला ॥ राजपद कोणाला दिलें सांग आम्हांला ॥ मग सुमेरसिंग गारदी बोले बाईला ॥ राजपद दिलें आई दादांनीं नारायणाला ॥ ( चाल ) ॥ आंग टाकिती धरणीला ॥ तोडी कुरळ्या केंसाला ॥ राज्याचा नाश माझ्या केला ॥ शिव्या देती राघोबादादाला ॥ ( चाल ) ॥ माझा हुकूम जाउनि सांग माझ्या नवऱ्याला ॥ नारायण धरुनि आण माझ्या कचेरीला ॥ नाहीं तर कुंकू पुशीतें मी आपल्या सदरेला ॥ दक्खनचा० ॥ ४ ॥

सुमेरशिंग गारदी होउनि तयार ॥ मला हजरी दे आनंदीबाई म्हणूनि लावी कट्यार ॥ मग शिरला आरसे महालांत उपसुनी तरवार ॥ हजार गारदी शिपायी बरोबर ॥ हातीं नागव्या तरवारी हातांमधिं भाले । त्यांनीं आरसे महाल वेढीला चौफेर ॥ केशरीभात जेवले होते नारायण ॥ ह्या राजवाड्या-मधिं झाले निद्राशयन ॥ ( चाल ) ॥ झाली गर्दी येकच हल्ला ॥ पर्वती आई गेली स्वप्नाला । उठ नारायण आतां तुझा घात आला । राव स्वप्नीं जागा झाला । उठोनि उभा राहिला । राजपुत्र थरथरां कांपला । पाणी आलें त्याच्या नेत्रांला ॥ राजपद भोवलें मला । नऊ महिने नाहीं भोगलें पु[illegible] राज्याला ॥ डोळाभर नाहीं पाहिलें अस्तूरीला ॥ आनंदीबाईनें आतांच

घात मांडिला ॥ आई बाप नाहीं जवळ सोडवायाला ॥ नाना फडनवीस नाहीं पुण्याचे सदरेला ॥ नारायण पळों लागला, आसरा नाहीं लपायाला॥ गाय होती देवपूजेला ॥ गाईच्या आड लपला मिठी गाईच्या गळ्याला ॥ गाईशीं बोलुं लागला । गोमाता म्हणती तुला ॥ प्राण वांचिव आतां आपुला ॥ गाय हंबरती खाशाला ॥ पाणी गाईच्या डोळ्याला ॥ सुमेरशिंग उभा राहिला तोडायाला ॥ गाईला वार लागला आसरा गायीचा सोडी-वला ॥ नारायण पळों लागला । हिंडोन सारा वाडा भयाभीत झाला । थरथरांच कांपत राघोबा दादापाशीं गेला ॥ दक्खनचा० ॥ ५ ॥

जिथून पळाले राव सुमेरशिंग माग । बरोबर घेऊनि गारदी केला लाग । शोध करित पुढें चालले लावला थांग । झणे इथून पळाले राव, आनंदी-बाई सुमेरशिंगाला सांगे ॥ मग गेले दादापाशीं सोडा राग ॥ मला द्यावें जीवदान टाकावें मागें ॥ ( चाल ) डोकीं घातली पोटांत ॥ मीठी मारितो गळ्यांत ॥ राजपद नको मला इथें ॥ माझ्या प्राणाचा होइल घात ॥ आनं-दीबाईचें चुलतींचें ऐकूं नको ॥ भट ब्राह्मण मला म्हणतात ॥ मी कोरण भिक्षा मागत जातों काशी तीर्थांत ॥ माझी गंगातिरीं अस्तुरी द्या माझ्या संगत ॥ दादासाहेब पुरवा माझा मनोरथ ॥ आली माया हृदयांत ॥ दादा-साहेब बोले सुमेरशिंगास नको करुं मुलाचा घात ॥ ( चाल ) ॥ माझ्या वडील भावाचा लेक ॥ राज्याला एकुलता एक ॥ शिर ठेविलें रायाचे हातीं वांचवा याला ॥ पुढें सुमेरशिंग गारदी दादासाहेबास बोलता झाला ॥ दक्खनचा० ॥ ६ ॥

अन्न पाणी लागेना गोड चैन पडेना आनंदीबाईला ॥ बारावर एक वाजला बाई घंटा झाला ॥ कां अजून सुमेरशिंग येईना सांगायाला ॥ मग सुमेरशिंग गारदी जवळ बोलाविला ॥ काय हुकूम दिला दादांनीं सांग मेल्या मला ॥ मग सुमेरशिंग गारदी बोले बाईला ॥ दादासाहेब हुकूम देईनात मला नारायण धरायाला ॥ किती शिकवूं ह्या मेल्याला बाई शिपु-र्ड्याला ॥ ( चाल ) ॥ तीनरुपयाच्या चाकराला । काय पुढलें होणार ठाऊक नाहीं ह्याला ॥ राजपद दिलें दादांनीं नारायणाला ॥ सर्पाच्या पाठीवर मेल्या तूं पाय दिला ॥ पुढें घात तुझ्या जीवाला ॥ तुझीं लेकरें-बाळें पुढें विकील दाणकाला ॥ ( चाल ) होयाचें होऊं दे जीवें मार दोघांला ॥ दक्खनचा० ॥ ७ ॥

सुमेरशिंग गारदी बोले दादाशीं ॥ यामुळें आपला प्राण तुम्ही त्यजीता ॥ पुढें आमचीं मनुष्यें कशीं घाण्यामधें गाळवितां ॥ दादांनीं हात काढिला मग झाला परता ॥ तुळाराम परदेशी नारायणाला झाला ओढिता ॥ वैऱ्यानें हात टाकिला खांद्यावरता ॥ ( चाल ) ॥ झाली मुक्त एकच घायीं ॥ रक्त वस्त्रें भिजली बाही ॥ रक्ताचे पुर वाही ॥ एक शकल झालं दुठायीं । मधें जानव्याचें हाल झालें कांहीं ॥ कढी भात पडला ठायीं ॥ चकचकती सगळी शाही म्हणून घेती उरावरी ॥ नारोबा नाईक पुरा झाला ॥ जखमा लागल्या विश्वराम ढेऱ्याला ॥ पर करुणा नाहीं आली भगवाना तुला ॥ दक्खनचा० ॥ ८ ॥

नारायण महाराज मोक्षपदाशीं गेला ॥ काय अंधार पडला पुणेंशहराला ॥ वाणीणी ब्राह्मणी शिंपीणी सोनारणी एकच कहर झाला ॥ काय राजपुत्र बाई गेला आईबाप नव्हते त्याला ॥ विधवापण आलं गंगाबाईला ॥ ब्राह्मण करिती हाय हाय, मोकली धाय, काय पंढरीराया विष्णुभक्त नेला ॥ मग आनंद आनंदीबाईला झाला ॥ सखा पुतण्या तिनें मारिला ॥ नानाफडनवीस नव्हते त्या वक्तीं पुण्याचे सदरेला ॥ ते गेले मेणवलीला आपुले गांवाला ॥ आबासाहेब पुरंदर किल्लेवाला ॥ नित्य मेजवानगी करी नानासाहेबाला ॥ तुम्ही यावें सास्वडाला राव भोजनाला ॥ पटवर्धनमहाराज सांगलीवाला ॥ श्रीमंताचा सोयरा भला काय बाजू श्रीमंताला ॥ मानकरी लोक जमले सास्वडीं भोजनाला ॥ सोन्याचीं केळीपत्रें आणिलीं भोजनाला ॥ बहु नाजुक स्वैपाक ब्राह्मणी विचारं झाला ॥ रांगोळ्या टाका आतां बसा भोजनाला ॥ सोन्याचीं पात्रें मांडलीं भोजनाला ॥ पांच शाखा वाढल्या आतां तुपपोळीचा वखत आला ॥ जसा पिंगळा गिजबिजला नाना शब्द बोले लोकांला ॥ तुम्ही मेजवानगी केली आम्हाला, पर करमत नाहीं आमच्या दिलाला ॥ हुरहुर वारा सुटला नानाफडनवीसाला ॥ कांहीं तरी दगा असेल पुण्यांत श्रीमंतांला ॥ तीन शब्द बोलला नाना उगीच बसला ॥ पुण्याचें पत्र आलें सास्वडाला ॥ सोवळे ब्राह्मण उठा नाना भोजनाला ॥ नानाफडनवीस बोले सर्व ब्राह्मणांला ॥ श्रीमंतांचें पत्र आलें आपुल्याला ॥ लाखोटा वाचूं मग बसूं भोजनाला ॥ लाखोटा फुटला पाणी आलें डोळ्यांला ॥ हिरा कंकण माणीक मोतीं नारायण गेला ॥ आनंदीबाईनें मोठा घात

रं. क्रमां. ७६० २०-३-५९ (८) नों. नं. ४६२५ 23-3-59

केला ॥ विनाशबुद्धी आली मला नानाला ॥ मी गेलों मेणवलीला आपले गांवाला ॥ म्हणूनि नारायण मोक्षपदाला गेला ॥ जिथलीं पात्रें तिथल्या ठिकाणाला ॥ सोंवळे ब्राह्मण ओंवळें मिळालें त्यांला ॥ दों रोजांचा उपवास नानाफडनवीसाला ॥ नाहीं मिळालं फराळाला शूर मर्दाला । अबलक पंचकल्याणी घोडा नानाला बसायाला ॥ घोडचवडीखालीं नाना पुण्याला आला ॥ तुम्ही उघडा दरवाजे पाहूंद्या राजश्रीला ॥ दोन शकलें दोन बाजुला विश्वराम ढेरे पडले उजव्या बाजूला ॥ येथें उपाय चालेना आपला ॥ राजा मोक्षपदाला गेला ॥ आनंदीबाईनें बरा घात केला ॥दक्खनचा०॥९॥

पटवर्धन महाराज बोले नानाफडनवीसाला ॥ होयाचें होऊन गेलें शब्द देवाला ॥ याची नाशवंत काया येईना कामाला ॥ धनी जाऊंद्या मोक्षपदाला ओंकारेश्वराला ॥ नानाफडनवीस बोले पटवर्धनराजाला । कसें जाऊं मी एकल्या नारायणाला ॥ वाघाचे संगतीनें कसें मारावें परदेशाला ॥ पटवर्धनमहाराज बोले नानाफडनवीसाला ॥ ठक कोल्हा परदेशी येइना आपुल्या हाताला ॥ वाघनख ह्याच्या बोटाला पांच हत्यारें डाभाला ॥ हजार माणूस जिमतीला ॥ सात माणसें मारलीं खून चढला परदेशाला ॥ तो अधिक जखमी करील कईकांला ॥ अफीणीचा खाणेवाला ॥ जरा ब्राह्मणी कावा हिकमत करतां मी ह्याला ॥ नानाफडनवीस जाऊन बसले तिसऱ्या मजल्याला ॥ मग कचेरी शोभे पटवर्धन राजाला ॥ त्यानें सुमेरशिंग परदेशी जवळ बोलविला ॥ त्याचे शिरीं हात ठेविला ॥ भलें मारलें नारायणाला ॥ राजपद मिळतें तुला ॥ दोघे मिळून चल जाऊं आनंदीचे भेटीला ॥ वाघनख ठेव धरणीला ॥ हत्यारें लाव जा आपुल्या ढलजाला ॥ माझा अबलक घोडा तुला बसायाला ॥ दोघे मिळुन चालले आनंदीचे भेटीला ॥ पटवर्धन महाराज उजव्या बाजूला ॥ नानाफडनवीस होते तिसऱ्या मजल्याला ॥ त्यांनीं शेल्याचा पदर हलविला ॥ त्यानें हुकूम केला सरदार लोकांला ॥ काय पहातां दादाहो तुमचा बाप चालिला ॥ एक म्हणतां हजार गर्दी त्याला ॥ नानाफडनवीस बोले सरदार लोकांला ॥ एके घायें मारूं नका परदेशाला ॥ हातापाया पलिते लावा जरा जाळा त्याला ॥ एक म्हणतां हजार गर्दी त्याला ॥ बोटीं बोटीं पाडले तुकडे परदेशी नाहीं आला वांट्यांला ॥ दक्खनचा० ॥ १० ॥

पटवर्धनमहाराज बोले नानाफडनवीसाला ॥ तीन रोज मुर्दा राहिला

अझुनि कांहीं हेतु नाहीं पुरला ॥ नानाफडनवीस बोले राघोबादादाला ॥ आनंदीबाईनें राज्याचा नाश केला ॥ सख्या पुतण्याचा वध केला ॥ किल्ल्यावर चढवा आनंदीबाईला ॥ तिन वर्षांची जुन्या नाचणीची भाकर दिला खायाला ॥ पावशेर मीठ पीठ दळायाला ॥ पावशेर पाणी द्यावें तोलून प्यायाला ॥ अनवाणी पायीं धाडावी गडकिल्ल्याला ॥ सुकुमार बाईची काया फोड पायाला ॥ त्या अर्ध्या किल्ल्याच्या वाटेनें बाईचा प्राण गेला ॥ घारी गिधाडाला सुकाळ झाला ॥ नाहीं मोक्षपद मिळालें आनंदीबाईला ॥ दक्खनचा० ॥ ११ ॥

नानासाहेब बोले सर्वत्र लोकांला ॥ हुकूम मागा गंगाबाईला ॥ धनी येऊंद्या मोक्षपदाला आंघोळीला ॥ गंगाबाई करी रोदन हरपलें रत्न ॥ गाईनें वत्स गिळलं देवा धन्य ॥ टाकोनि हत्ती घोड गोधन ॥ नाहीं हौस पुरली गेले नारायण ॥ (चाल) मनीं हौस होती फार ॥ पुणें शहर करीन गुलजार ॥ वाणी उदमी दुकानदार ॥ नारायणपेठ तयार ॥ कुठें एकत होता ईश्वर ॥ काय राजवाड्यामधिं पडला अंधार ॥ आंग धरणीला टाकीती॥ कुरळे केंसाला तोडिती तुमचे संग निघतें सती ॥ दोघे मिळोन चला जाऊं ओंकारेश्वरापाशीं आया मावल्या समजावती गंगुबाईशीं ॥ नको रडूं बाई दुःख आहे सर्वत्रांशीं ॥ नानाफडनवीस बोले गंगाबाईशीं ॥ सती निघायाचा हुकूम मिळेना बाई तुशीं ॥ तुझ्या देहाची झडती दे मला नानाशीं ॥ गंगाबाई बोले आयाबायाशीं ॥ कशी मी निघों बाई सती पांचा महिन्यांची मी गर्भवती ॥ नानाफडनवीस समजावितो गंगूबाईशीं नको रडूं बाई धोका बसेल तुझ्या गर्भाशीं ॥ कन्या का पुत्र होईना बाई तुशीं ॥ मी गुतराज्य चालवीन अकल आहे मज नानाशीं ॥ अशी समजाविली बहुत नानापरी ॥ पन्नास बायका दिल्या संग गर्भारिणी ॥ कांहीं वाणिणी ब्राह्मणी शिंपिणी सोनारणी ॥ (चाल)॥ तुम्ही राहावे पुरंदराला ॥ बाईचा गर्भ वाढवायाला ॥ सगळ्यामधिं एकच दाई त्यांना ॥ गंगाबाई म्हणे नानाला । धनी जाऊं द्या मोक्षपदाला ॥ मग जाईन मी पुरंदराला वनवासाला ॥ दक्खनचा ० ॥ १२ ॥

नानाफडनवीसानें हुकूम केला । धनी माडींतला काढिला । माणीकचौकांत आंघोळीला ॥ आटोकाट ब्राह्मण तिथें जमा झाला ॥ ते आले होते पर्वतीच्या दक्षिणेला ॥ मग मिळाले ब्राह्मण गणित नाहीं त्याला ॥

नानाफडनवीस बोले उपाध्यें भटाला ॥ दोन शकलें दोन बाजूला ॥ तुम्ही काढा सोवळं बांधा राजश्रीला ॥ पाणी ठेवलं आंघोळीला ॥ सगळा अलंकार चढविला ॥ मोत्याचा तुरा लाविला ॥ दोन हुजुरे दोन बाजूला ॥ खासा मिरवायाला लागला ॥ मग गंगाबाई हांक मारी राजश्रीला ॥ काय द्वारका सोडुनी कृष्ण निघाला ॥ नळानें टाकिलें दमयंतीला ॥ भोळा शंकर होता पार्वतीला ॥ हरिश्चंद्र होता तारामतीला ॥ रामचंद्रानें मोकलिलें सिताबाईला । असा वनवास भगवंतानें आमच्या शिरीं दिला ॥ मग पुकार कळली पुणेंशहराला ॥ गर्भार बाया चालल्या पाहायाला ॥ लेंकुरवाळ्या बाळें घेतलीं कडेला ॥ जागा मिळेना उभें राहायाला ॥ महाराज ओंकारेश्वरावर नेला ॥ ( चाल ) राव काढले मध्यान्हरात्रीं दिधला अग्न खंडीभर लांकडें आठ मण चंदन ॥ सरण दिलं चेतवून ॥ चार वेढे हिंडली गाय पांचव्या वेळ्यानें गाईनें प्राण दिला सरणावर ॥ आले तुळाजी खिजमतगार ⁄चापाजी टिळेकर ॥ त्याचे हुजुरे मंडळी चाकर ॥ चालूनि आले सरणावर ॥ आम्ही सरकारचे चाकर ॥ याचें निमक खाल्लें फार ॥ पुढें वांचूं नये विचार ॥ उड्या टाकिती सरणावर ॥ जळून गेले चौघेजण ॥ गाय गेली जळून खाशावर ॥ हीं ऋणानुबंधाचीं कामें ॥ चौघे गेलीं वैकुंठीं चालून ॥ तिथून त्याचा न्याय केला कोणी ॥ येथूनि वर्तमान सर्व झालें ॥ लहिरी मुकुंदाकवी बोले ॥ झाला दादाचा बोल मला नारायण मोक्षपदाला गेला ॥ दक्खनचा ० ॥ १३ ॥

दिस मास उदास झाला ॥ मग चिंता पडली गंगाबाईला ॥ रंगमहालीं करमेना जात्यें पुरंदराला ॥ दाहा बाळंतिणी झाल्या खबर नाहीं कळली गंगाबाईला ॥ काय नालख्या पालख्या चालल्या पुरंदराला ॥ शुद्ध सोमवार दिवशीं वेळ घटका आली तिला ॥ दाइ म्हणे नानाफडनवीसाला ॥ गंगाबाईचा प्रसूत व्हायचा वखत आला ॥ एक सोबतीण मिळाली तिला ॥ दोघींची वेळ घटका कळली भगवंताला ॥ नानाफडनवीस बोले त्या दाईला ॥ सोन्याच्या वेळा चढवीन बाई तुला तुझें माझें इमान ठावें भगवानाला ॥ काढा वस्त्र डोळे दोघींचे बांधा या समयाला ॥ कन्या झाली गंगाबाईला ॥ पुत्र झाला दुसरे बाईला ॥ ही अदलाबदल कळली नानाफडनवीसाला ॥ दाई म्हणे नानासाहेबाला ॥ गंगाबाईला पुत्र झाला ॥ हत्तीवर साकरा वांटल्या आनंदोत्सव झाला ॥ खबर कळली पुणें शहराला

अजुनि कांहीं हेतु नाहीं पुरला ॥ नानाफडनवीस बोले राघोबादादाला ॥ आनंदीबाईनें राज्याचा नाश केला ॥ सख्या पुतण्याचा वध केला ॥ किल्ल्यावर चढवा आनंदीबाईला ॥ तिन वर्षांची जुन्या नाचणीची भाकर दिला खायाला ॥ पावशेर मीठ पीठ दळायाला ॥ पावशेर पाणी द्यावें तोलून प्यायाला ॥ अनवाणी पायीं धाडावी गडकिल्ल्याला ॥ सुकुमार बाईची काया फोड पायाला ॥ त्या अर्ध्या किल्ल्याच्या वाटेनें बाईचा प्राण गेला ॥ घारी गिधाडाला सुकाळ झाला ॥ नाहीं मोक्षपद मिळालें आनंदीबाईला ॥ दक्खनचा० ॥ ११ ॥

नानासाहेब बोले सर्वत्र लोकांला ॥ हुकूम मागा गंगाबाईला ॥ धनी येऊंद्या मोक्षपदाला आंघोळीला ॥ गंगाबाई करी रोदन हरपलें रत्न ॥ गाईनें वत्स गिळलं देवा धन्य ॥ टाकोनि हत्ती घोडे गोधन ॥ नाहीं हौस पुरली गेले नारायण ॥ ( चाल ) मनीं हौस होती फार ॥ पुणें शहर करीन गुलजार ॥ वाणी उदमी दुकानदार ॥ नारायणपेठ तयार ॥ कुठें ऐकत होता ईश्वर ॥ काय राजवाड्यामधिं पडला अंधार ॥ आंग धरणीला टाकीती॥ कुरळे केंसाला तोडिती तुमचे संग निघतें सती ॥ दोघे मिळोन चला जाऊं ओंकारेश्वरापाशीं आया मावल्या समजावती गंगुबाईशीं ॥ नको रडूं बाई दुःख आहे सर्वत्रांशीं ॥ नानाफडनवीस बोले गंगाबाईशीं ॥ सती निघायाचा हुकूम मिळेना बाई तुशीं ॥ तुझ्या देहाची झडती दे मला नानाशीं ॥ गंगाबाई बोले आयाबायाशीं ॥ कशी मी निघों बाई सती पांचा महिन्यांची मी गर्भवती ॥ नानाफडनवीस समजावितो गंगूबाईशीं नको रडूं बाई धोका बसेल तुझ्या गर्भाशीं ॥ कन्या का पुत्र होईना बाई तुशीं ॥ मी गुप्तराज्य चालवीन अक्कल आहे मज नानाशीं ॥ अशी समजाविली बहुत नानापरी ॥ पन्नास बायका दिल्या संग गर्भारिणी ॥ कांहीं वाणिणी ब्राह्मणी शिंपिणी सोनारणी ॥ ( चाल ) ॥ तुम्ही राहावे पुरंदराला ॥ बाईचा गर्भ वाढवायाला ॥ सगळ्यामधिं एकच दाई त्यांना ॥ गंगाबाई म्हणे नानाला । धनी जाऊं द्या मोक्षपदाला ॥ मग जाईन मी पुरंदराला वनवासाला ॥ दक्खनचा ० ॥ १२ ॥


नानाफडनवीसानें हुकूम केला । धनी माडींतला काढिला । माणीकचौकांत आंघोळीला ॥ आटोकाट ब्राह्मण तिथें जमा झाला ॥ ते आले होते पर्वतीच्या दक्षिणेला ॥ मग मिळाले ब्राह्मण गणित नाहीं त्याला ॥

नानाफडनवीस बोले उपाध्यें भटाला ॥ दोन शकलें दोन बाजूला ॥ तुम्ही काढा सोवळं बांधा राजश्रीला ॥ पाणी ठेवलं आंघोळीला ॥ सगळा अलंकार चढविला ॥ मोत्याचा तुरा लाविला ॥ दोन हुजुरे दोन बाजूला ॥ खासा मिरवायाला लागला ॥ मग गंगाबाई हांक मारी राजश्रीला ॥ काय द्वारका सोडुनी कृष्ण निघाला ॥ नळानें टाकिलें दमयंतीला ॥ भोळा शंकर होता पार्वतीला ॥ हरिश्चंद्र होता तारामतीला ॥ रामचंद्रानें मोकलिलें सिताबाईला । असा वनवास भगवंतानें आमच्या शिरीं दिला ॥ मग पुकार कळली पुणेंशहराला ॥ गर्भार बाया चालल्या पाहायाला ॥ लेंकुरवाळ्या बाळें घेतलीं कडेला ॥ जागा मिळेना उभें राहायाला ॥ महाराज ओंकारेश्वरावर नेला ॥ ( चाल ) राव काढले मध्यान्हरात्रीं दिधला अग्न खंडीभर लांकडें आठ मण चंदन ॥ सरण दिलं चेतवून ॥ चार वेढे हिंडली गाय पांचव्या वेळ्यानें गाईनें प्राण दिला सरणावर ॥ आले तुळाजी खिजमतगार चापाजी टिळेकर ॥ त्याचे हुजुरे मंडळी चाकर ॥ चालुनि आले सरणावर ॥ आम्ही सरकारचे चाकर ॥ याचें निमक खाल्लें फार ॥ पुढें वांचू नये विचार ॥ उड्या टाकिती सरणावर ॥ जळून गेले चौघेजण ॥ गाय गेली जळून खाशावर ॥ हीं ऋणानुबंधाचीं कामें ॥ चौघें गेलीं वैकुंठीं चालून ॥ तिथून त्याचा न्याय केला कोणी ॥ येथूनि वर्तमान सर्व झालें ॥ लहिरी मुकुंदाकवी बोले ॥ झाला दादाचा बोल मला नारायण मोक्षपदाला गेला ॥ दक्खनचा ० ॥ १३ ॥

दिस मास उदास झाला ॥ मग चिंता पडली गंगाबाईला ॥ रंगमहालीं करमेना जायें पुरंदराला ॥ दाहा बाळंतिणी झाल्या खबर नाहीं कळली गंगाबाईला ॥ काय नालख्या पालख्या चालल्या पुरंदराला ॥ शुद्ध सोमवार दिवशीं वेळ घटका आली तिला ॥ दाइ म्हणे नानाफडनवीसाला ॥ गंगाबाईचा प्रसूत व्हायचा वखत आला ॥ एक सोबतीण मिळाली तिला ॥ दोघींची वेळ घटका कळली भगवंताला ॥ नानाफडनवीस बोले त्या दाईला ॥ सोन्याच्या वेळा चढवीन बाई तुला तुझें माझें इमान ठावें भगवानाला ॥ काढा वस्त्र डोळे दोघींचे बांधा या समयाला ॥ कन्या झाली गंगाबाईला ॥ पुत्र झाला दुसरे बाईला ॥ ही अदलाबदल कळली नानाफडनवीसाला ॥ दाई म्हणे नानासाहेबाला ॥ गंगाबाईला पुत्र झाला ॥ हत्तीवर साकरा वांटल्या आनंदोत्सव झाला ॥ खबर कळली पुणें शहराला

गंगाबाईला पुत्र झाला ॥ सवाईमाधवराव नांव शोभे त्याला सोळा वर्षें राज्य भोगलें पुणें शहराला ॥ सत्रावे वर्षीं कलिप्रहार आला ॥ शिलंगन खेळोनि माधवराव घराला आला । तेथें नानाफडनवीस त्याला उणा शब्द बोलिला । कारंज्यावरी उडी टाकिली प्राण त्याचा गेला ॥ तेथुन ब्राह्मणांचा आचार धर्म लोपला ॥ दक्खनचा० ॥ १४ ॥

नं.
ता.



मराठी ग्रंथ संग्रहालय
काव्य नं. ५८०

# खर्ड्याच्या लढाईचा पोंवाडा.

श्रीमंत पेशवे सवाई माधवराव ॥ गोकूळीं उभारिल्या गुढ्या जन्मला देव ॥ झाला म्हणती कृष्ण अवतार, करिती जयजयकार, शूर जसे भीमार्जुन पांडव ॥ १ ॥ धृ. ॥ ( दुष्मन कांपे थर थर, झाले बेजार, वीर जसे भीमार्जुन पांडव. )

१

राजाधिराज, महाराज, गरीब नवाज, धनी श्रीमंत ॥ भासती सदैव देव आमुचे हेचि भगवंत ॥ पाषाण धातूच्या मूर्ती, धरत्री वरती, जागोजाग किती, आहेत अनंत ॥ त्या पूज्य परंतु नाहींत प्रगट जीवंत ॥ तसे नव्हेत हे तर देव, कलीमध्यें भूदेव, ब्राह्मण संत ॥ त्यावंशीं पेशवे जाहले सबळ बळिवंत ॥ त्यांचे वंशीं सवाई माधवराव, जन्मले देव, कृष्ण अवतार तसें केलें नांव ॥ प्रजेला जाहला आनंद, करिती जयजयकार, त्यांचें यश गाव ॥ १ ॥

२

तो पांडवाचा अर्जुन यश श्वरी ॥ ती पहिली निघाली स्वारी मोंगलावरी ॥ त्यांनीं डेरे दिले समद्यानी गार पिरावरी ॥ तो मोंगलाचा वकील विनंत्या करी ॥ ते दौलतराव शिंदे अघाडी बिनीवरी ॥ त्या होळकराची फौज गर्जत भारी ॥ त्या बाबा फडक्याची कोरबंदी न्यारी ॥ त्या जरीपटक्याखालीं हुजूरात चाले सारी ॥चाल॥ राव माने मानकर, घाटगे पाटणकर, यादव निंबाळकर, ते धारूकर भोसले किं सुपेकर स्वारी बरोबर ॥ मोहिते व शिरके येऊन मिळाले रणावर ॥ ते गणेशपंत ढमढेरे आले बहाद्दर कीं सवते दूर ॥ ते मानाजी फाकडे भले रणशूर मारी तरवार ॥ चाल ॥ चालताना स्वारी शोभती, कोर बंदी जपून चालती ॥ अशा सरदारांच्या गती ॥ कालुकर्णे बाजे वाजती ॥ आपलाले बिनीवर हत्ती ॥ पुढें सांडणी स्वार धांवती ॥ दळाची खबर आणती ॥ पुढें घोडेस्वार धांवती ॥ एकामेकां इशारत देती ॥ शिस्ती शिस्तीन चालाव म्हणती ॥ घोडदळ पायदळ कोठवर पहाव ॥ २ ॥

३

तो पहिला शहाणा नाना नांव साजे ॥ त्यान श्रीमंताचे भले राखिले राज्य ॥ अशी पुण्यपवित्र खलबतें होतीं रोज ॥ ते पंत प्रतिनिधी जसें सूर्याचें तेज ॥ ते अपाजी बळवंतराव भुजेशीं भुज ॥ ते भवानराव घाटगे नांव साजे ॥ त्यापानशावर रावसाहेबांची लई रीझ ॥ त्या रास्त्याचा हमेश डंका वाजे ॥ चाल ॥ अशी गडबड जाहली फार शिलेदार घोडें मिळेना ॥ दोशांचें घोडे चौशाला अशा खाशाला कोणी देईना ॥ इसाच तट्टु साठाला अशा दाटीला कुठ मिळेना ॥ भिवरेवर पडला तळ रयत तळमळ, करिती हळहळ, नजर थांबना ॥ दाण्याचं झालं हातरूण, खुशाल पाहून, कोण घेईना ॥ बायकोच काढलं मोतीं, घेतलं हातीं, इचार मग करिती, गुजर ठेविना ॥ टक्क्याच एक पायलीला, दळणवालीला, दळून देईना ॥ चाल ॥ तीन लक्ष मिळाल दळ, आपुलाले धरती बिलं, लष्करांत पडली भूल, मोठ मोठ कीं लढनवाले, मोठ मोठ कीं समलेवाले ॥ ते नारोशंकर विठ्ठल शिवदेव ॥ ३ ॥

४

गेले कागद नागपुरा कीं भोसल्याला ॥ दरकूच येऊन शिनवरती मिळाला ॥ तो जिवबादादा बक्षी मग उठला सिंह जसा गर्जला ॥ ते वेळे काय बोलला माधवरायाला ॥ त्यो कसला मोंगल अन् काय जिन्नस आहे पाहूंद्या मजला ॥ तो कंचा फिरंगी गोळा मारनेवाला ॥ फौजेंत केली ताकीद सड स्वारीला । त्या गणेशपंत भेऱ्याला बाबा फडक्याला ॥ त्या परशुराम भाऊला जिवबा दादाला ॥ तुम्ही मिळुन शेनी जावे हो झुंझा-याला ॥ हर हर बोलती मरूं कीं मारूं या समयाला ॥ चाल ॥ मोंगलान गलीम पाहिला, घोडा सजविला, तयार मग जाहला, कीं त्या रंगणांत ॥ भले भले मायेचे पूत, सुरे हातांत, मारिती हात ॥ ते रावरंभा सरदार भले रणशूर, बसून हौद्यांत, तिरंदाजीत ॥ ते मशुल्लमुलुक हत्तीच्या, हौद्यांत बसून हाणा हाणा असें म्हणवीत ॥ चाल ॥ बहु कोस मागें सारिला, मार पडली हुजुरातीला ॥ त्या परशुराम भाऊला ॥ त्या बाबासाहेब फडक्याला॥ जखमा चढल्या मरदाला ॥ अशा कैक सरदाराला ॥ जीवाची पर्वा नाहीं त्यानला, देह वाहिले स्वामी कार्याला । मग जिवबादादा काय बोलिला । इथंच मरूं अन् जाऊं आम्ही स्वर्गाला । राखूं मराठ्यांच्या नांवाला, घेऊं

५४०



छत्रपतीच्या नांवाला । हरहर बोलती हाणा म्हणती शत्रूला, रणखांब रोविला मुक्काम घोडेगांवाला । मराठा गर्जू, लागला । गर्जना करिती हर हर महादेव ॥ गर्जना करिती छत्रपति शिवदेव ॥ ४ ॥

५

आला मोंगल देशावर कळल्या खबरी । गांवान गांव. ओस पडली सारी । ही पुण्यप्रतापी रावसाहेबाची स्वारी । त्या शाहूरायाचा हात पुरता शिरीं ॥ त्या बुधवारच्या दिवशीं तिसऱ्या प्रहरीं ॥ त्या जिवबादादान तोफा लाविल्या दुहेरी ॥ त्या भोसल्याच्या बाणाच्या कसल्या भरारी ॥ जशी हनुमंतान लंका जाळिली सारी ! तेंवि सवाई माधवराव यशश्वरी ॥ हाणा हाणा म्हणून निशाण उठलीं सारीं ॥चाल॥ मोंगलान गलिम पाहिला पळ काढला, पीर कोपला, अशा समयाला ॥ शत्रूला धीर नाहीं राहिला, झाला गलबला, करिती मग अल्ला ॥ मराठ्यांनीं कावा साधिला, लुटी फार केल्या, घाला घातला, रात्री समयाला ॥ खर्ड्यांस नेऊन घातला नबाब साहेबाला ॥ पाण्याचा झाला कहर, करिती हाहाःकार, दाणा शेरभर, आला कवलाला ॥ मग नबाब बोलतां झाला माधवरायाला ॥ चाल ॥ राव देतो मी खंडणी ॥ घ्या मुलुख तुम्ही लिहुनी ॥ मशूला. देतो धनी ॥ तेव्हां परशुराम भाऊनी ॥ रावसाहेब नाना फडनीसानी ॥ मनसुबी केली बैसुनी ॥ दिली निशाण सोडुनी ॥ आले पुण्याशी निघुनी ॥ यश घेतलें पांडवांनीं ॥ बहुरंग्याची लावणी ॥ पवाडा केला मर्दांनी ॥ त्या गुरू रायाचें वदन नित्य पहाव ॥ ५ ॥

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.
ता.

## ( श्रीमंत नारायणराव पेशवे व खर्ड्याची लढाई ) या पोंवाड्यांचें नोटेशन.

पोंवाड्यास नेहमीं केरवा ताल लागतो. त्याप्रमाणें यालाही तोच ताल आहे. बहुतकरून हा ताल सर्वांस माहीत असतो, माहीत नसला तरी ऐकल्याबरोबर त्याचें वजन ध्यानांत येतें. एवढ्यासाठीं फक्त त्याची सम ज्या अक्षरावर येते त्यावर एकाचा आंकडा दिला आहे. त्याहून सूक्ष्म व ज्यास्त खुलासा करण्याची विशेष जरूर नाहीं असें वाटल्यावरून इतर गोष्टींचा खुलासा केला नाहीं.

भा. स्व. से. मं. चिटणीस श्री. पळसुले यांनीं पोंवाड्याचें नोटेशन असावें अशी इच्छा प्रदर्शित केली, म्हणून प्रत्येक चालीची नुसती सा रे ग म आणि तालाचें मुख्य वजन इतकेंच येथें दिलें आहे. गाण्यांतील चिजेप्रमाणें पोंपाडा म्हणणें हें फार कठीण नाहीं. यासाठीं कोणतें अक्षर किती जलद किंवा सावकाश म्हटलें जावें याचें संबंधानें सा रे ग म खालीं दिल्या जाणाऱ्या पाव, अर्धी, पाऊण, एक इत्यादि मात्रेच्या खुणा दिल्या नाहींत. पोंवाड्यामध्यें असणारा वीररस किंवा करुणरस वठविणें हें म्हणणारावर अवलंबून राहील. आणि पोंवाड्यांत असलेला वीररस किंवा करुणरस श्रोत्यांचे मनावर ठसवून देणें ही गोष्ट मुख्य असलेमुळें बारीकसारीक सा रे ग म फारशी न देतां आमची पोंवाडा म्हणण्याची घाटणी कशी आहे हें साधारणपणें लक्षांत येण्यासाठीं जरूर वाटली तेवढी सा रे ग म व तालाची फोड केली आहे.

तसेंच कोमल तीव्र स्वरांची फारशी भानगड नसून फक्त शुद्ध व कोमल स्वर येतात. त्या करितां ज्या स्वराखालीं पायमोडी खूण केली असेल तो स्वर कोमल समजावा, बाकी सर्व शुद्ध स्वर समजावे. तार सप्तकांतील स्वरावर बारीक टिंब दिलें आहे. मंद्र सप्तकाच्या स्वरास खालीं टिंब दिलें आहे. ज्या स्वराला कोठेंच टिंब नाहीं तो मध्य सप्तकांतील समजावा.

( १ )

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| द ख्ख न चा | दि वा | मा ल व ला | हि रा | ह र प ला। |
| सां सां सां सां | सां सां | सां नी नी नी | नी नी | नी नी ध प |
| १ | | | १ | | १ |

मराठी ... दा. क्र. 2496

का य गु पी त घा ला के ला ना रा य ण रा ऽ वा ऽ ला
नी़ नी़ नी़ नी़ नी़ नी़ नी़ ध प प प म म ध प म ग् ग्
१ १ १

क शी क रु णा न व्ह ती आ ली रा घो बा ऽ ला ऽ हो ऽ
ग् ग् ग् ग् ग् ग् ग् ग् ग् ग् ग् ग् ग् रे ग् रे ग् रे सा
१ १ १

अ प घा त क रू न मा रि ले
नी़ नी़ नी़ नी़ नी़ नी़ नी़ नी़ सा रे्
१ १

स ख्या पु त ण्या ला जी ऽ जी
रे् रे् नी़ नी़ सा रे् नि रे सा
१ १

ए क छ त्र क रू न गे ले रा ऽ व ऽ मा ध व रा ऽ व जी ऽ जी
म म म म म म म म म ग म ग रे रे नी़ नी़ सा रे रे नि रे जी
१ १ १ १

या पोंवाड्यांत दोनच चाली आहेत. तिसरी एक चाल आहे. तीचें नोटेशन देण्याची फारशी अवश्यकता नसलेमुळें तें दिलें नाहीं.

[ १ ]

रा जा धि रा ज म हा रा ज ग री ब
ध सां ध सां सां सा सा नी़ नी़ नी़ नी़ नी़
१ १

न वा ऽ ज ध नी श्री ऽ मं त
नी़ ध प प प म ध प ग् ग्
१ १

भा स ती स दै व दे व आ मु चे हे च
ग् ग् ग् ग् ग् ग् ग् ग् ग् रे सा नी़ नी़
१ १ १

भ ग वं ऽ त जी ऽ जी
नी़ नी़ सा रे रे नी रे सा
१ १

[ २ ]

| | | | |
|---|---|---|---|
| तौ | पां ड वां चा | अ र्जु न | य श श्व री |
| म | म म म म | म म ग | रे नी सा रे |
| | १ | १ | १ |

[ ३ ]

| | | | |
|---|---|---|---|
| अ शी | ग ड ब ड | झा ली | फा ऽ र |
| नी सा | नी नी सा नी | ध नी | सा रे रे |
| | १ | | १ |

[ ४ ]

| | | | | |
|---|---|---|---|---|
| शि ले | दा रा | घो डे | मि ळे ना | जी |
| सा रे | नि सा | ध ध | नी सा रे | सा |
| | १ | | १ | |

यांत एकंदर तीन चाली आहेत. धृपद—दख्खनचा दिवा मालवला या प्रमाणेंच असल्यामुळें त्याचें नोटेशन दिलें नाहीं. ताल स्वराची माहिति शहाजीचे पोंवाड्याप्रमाणें.

गो० गो० देसाई.

चा.—गो. गा. समाज.

REFBK-0002857
REFBK-0002857
२८५७